तरुण भारत
Paschim Vidarbha | 2023-08-21 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# आत्मनिर्भर भारतासाठी युवकांनी उद्योजक व्हावे

## उद्योजक आरोकर यांचे आवाहन

◆ अमरावती, २० ऑगस्ट

संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने आंतरराष्ट्रीय उद्यमिता दिवस आयोजित करण्याचे आवाहन जगातील सर्व देशांना करण्यात आले आहे. त्याकरिता दरवर्षी २१ ऑगस्ट हा दिवस निश्चित करण्यात आला आहे. हा दिवस मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा, असे आवाहन स्वावलंबी भारत अभियानचे जिल्हा समन्वयक व उद्योजक अमित आरोकर यांनी केले आहे.

युवकांमध्ये उद्योगाप्रति आकर्षण निर्माण व्हावे यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयांमध्ये हा दिवस साजरा करावा, असे विनंती पत्र स्वावलंबी भारत अभियान विदर्भ प्रांताच्या वतीने कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांना देण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी भारताला आत्मनिर्भर करण्याकरिता जिवापाड मेहनत करीत आहेत. या संदर्भात युवकांनी नोकरी मागणारे न होता, नोकरी देणारे होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन ते करीत असतात. युवकांनी स्वरोजगार सुरू केल्यास देश लवकर आत्मनिर्भर होईल, असे अनेक अर्थतज्ज्ञांचे मत आहे. आपल्या महाविद्यालयात येत्या २१ ऑगस्ट २०२३ ला आंतरराष्ट्रीय उद्यमिता दिवसाचे आयोजन करावे, असे आवाहन आपणास करीत आहोत. या कार्यक्रमात महाविद्यालयांनी स्वतःचा उद्योग करीत असलेल्या माजी विद्यार्थ्यांना बोलावून त्यांचे व्यावसायिक अनुभव विद्यार्थ्यांसमोर ठेवले तर विद्यार्थ्यांना उद्योग सुरू करण्याकरिता प्रोत्साहन मिळू शकते.



या पद्धतीने आंतरराष्ट्रीय उद्यमिता दिवस आपल्या महाविद्यालयात साजरा करावा, आयोजनात सहकार्य करण्याची तयारी स्वावलंबी भारत अभियानाची असल्याचे अमित आरोकर यांनी सांगितले.

◄(तभा वृत्तसेवा)